## कृषी विज्ञान संकुल, काष्टी, मालेगाव येथे कृषी दिन मोठ्या उत्साहात साजरा

महाराष्ट्रातील हरितक्रांतीचे जनक व महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून कृषी विज्ञान संकुल काष्टी, मालेगाव, कृषी विभाग, मालेगाव व पंचायत समिती, मालेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी विज्ञान संकुल, काष्टी, मालेगाव या ठिकाणी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष कृषी विज्ञान संकुलाचे प्रमुख सन्माननीय डॉ. सोनवणे सर यांनी, उपस्थित शेतकरी, कृषी विभागाचे अधिकारी, विद्यार्थी यांना मार्गदर्शन केले. प्रमुख उपस्थितीमध्ये मालेगावचे उपविभागीय कृषी अधिकारी, सन्माननीय गोकुळ अहिरे साहेब यांनी शेतकऱ्यांना उपयुक्त अशा कृषी विभागाच्या योजना बद्दल माहिती दिली. याप्रसंगी कृषी विज्ञान संकुलातील शास्त्रज्ञ डॉ. पंकज सूर्यवंशी, डॉ. प्रकाश तापकीर, डॉ. अमोल विरकर व डॉ. नंदलाल देशमुख यांनी विविध विषयावर शेतकरी बांधवांना मार्गदर्शन केले. प्रगतशील महिला शेतकरी म्हणून श्रीमती मनीषाताई इंगळे व श्रीमती भावनाताई निकम यांनी उपस्थितांना त्यांच्या शेतीत करत असलेल्या प्रयोगांबद्दल मार्गदर्शन केले.

याप्रसंगी कृषी विभाग मालेगाव यांच्याकडून प्रगतशील शेतकरी बांधवांचा शेतीतील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी कृषी विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी, कृषी विज्ञान संकुलातील सर्व अधिकारी कर्मचारी व विद्यार्थी तसेच पंचायत समिती, मालेगाव येथील सर्व अधिकारी व कर्मचारी याबरोबरच मालेगाव पंचक्रोशीतील सर्व शेतकरी बांधवांनी कार्यक्रमात सहभाग नोंदविला.



## महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी

# कृषी विद्यान संकुल, काष्टी

### KVS NEWS





**काष्टी :** कृषी दिनानिमित्त माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करताना कृषी विज्ञान संकुलातील अधिकारी.

## कृषी विज्ञान संकुलात कृषी दिन उत्साहात

मालेगाव : येथील काष्टी कृषी विज्ञान संकुलात हरितक्रांतीचे जनक व माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. सोनवणे होते. त्यांनी शेतकरी, कृषी विभागाचे अधिकारी व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उपविभागीय कृषी अधिकारी गोकूळ अहिरे यांनी शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या योजनांबद्दल माहिती दिली. याप्रसंगी कृषी विज्ञान संकुलातील शास्त्रज्ञ पंकज सूर्यवंशी, प्रकाश तापकीर, अमोल वीरकर व नंदलाल देशमुख यांनी विविध विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. प्रगतिशील महिला शेतकरी मनीषा इंगळे व भावना निकम यांनी त्यांच्या शेतात करीत असलेल्या प्रयोगाबद्दल माहिती सांगितले. यावेळी मालेगाव कृषी विभागाकडून शेतकऱ्यांच्या शेतीतील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.